# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

## नियामक मंडळाची ४० वी बैठक दिनांक १ जुलै २००४

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४० वी बैठक दि. १.७.२००४ रोजी मा. मंत्री महोदयांचे कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. ४०/१

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ३९ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. ४०/२

''ठराव करण्यात येतो की, कृष्णा खोऱ्यातील टंचाईग्रस्त तालुक्यातील दुष्काळ निवारणार्थ कार्यक्रमांतर्गत कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया मर्यादित कालावधीत पूर्ण होण्यासाठी या कामांच्या नवीन निविदा बोलाविण्यासाठीचा सूचना कालावधी **(Notice Period)** कामांची आवश्यकता व तातडीनुसार २० दिवसांचा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कामांच्या निविदांस नेहमीपेक्षा अधिक प्रसिध्दी देण्यात यावी.''

ठराव क्र. ४०/३

''ठराव करण्यात येतो की, टेंभू, ताकारी व आरफळ या प्रकल्पांच्या नियोजनातील कडेगांव तालुक्याच्या पाणी वाटपामध्ये कोणताही बदल न करता तालुक्यातील लाभक्षेत्रानुसार तालुक्याच्या वाट्याला येणारे पाणी लाभधारकांनी स्थापन केलेल्या पाणी वापर संस्थांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. पाणी वापर संस्था लाभक्षेत्राबाहेरील कडेगांव तालुक्यातील वंचित क्षेत्रास त्यांच्या वाट्याचे काही पाणी काटकसर करुन/सुधारित सिंचन पद्धती (ठिबक/तुषार) वापरुन उपलब्ध करुन देऊ शकतील. मात्र त्यासाठीचा खर्च महामंडळ करणार नाही. तसेच लाभधारकांकडून पाणी वापर संस्था स्थापण्यात आली नाही तर शासनाच्या/महामंडळाच्या मंजूर नियोजनानुसार पाणी वाटप करुन सिंचन करण्यात येईल.''

ठराव क्र. ४०/४

''ठराव करण्यात येतो की, टेंभू प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील खानापूर व आटपाडी तालुक्यातील परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केलेल्या यादीनुसार ६२ को.प.बंधारे टेंभू प्रकल्पाचा भाग म्हणून समाविष्ट करण्यास नियामक मंडळ खालील अटींसह मान्यता देत आहे.

१. सदर प्रस्तावातील कामे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत हाती घेण्यासाठी जलसंधारण विभागाची सहमती घेणे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

२. टेंभू प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालात या कामांचा समावेश करणे.

३. या कामांसाठी स्वतंत्र निधीची मागणी नोंदवून टेंभू प्रकल्पाच्या या विशिष्ट कामांसाठी निधी प्राप्त झाल्यावर ही को.प. बंधाऱ्यांची कामे सुरु करणे.''

ठराव क्र. ४०/५

"ठराव करण्यात येतो की, शासन पत्र क्र. एलएनडी-२०९७/१२३/२४९/९७/सिंव्य(म) दि.१०.६.९९ अन्वये सूचित केल्याप्रमाणे गुलटेकडी, पुणे येथील सर्व्हे नं. ५४३/अ मधील ३ एकर ३९ गुंठे जागा पाटबंधारे विभागास आवश्यक असल्याने पाटबंधारे विभागाकडेच ठेवणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४०/६

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अधिपत्याखालील खडकवासला धरणाच्या बॅक वॉटर लगतची व इन्स्टिट्युट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी जवळच्या रस्त्याच्या मधील या पूर्वीच ५ वर्षे मुदतीकरिता दिलेली १७५२० चौ.मी. जागा सध्याचे भाडे ५ वर्षात दुप्पट होईल, अशा तऱ्हेने दरमहा भाडेपट्टा आकारला जाईल, या भाडेतत्वावर आणि त्याच अटी व शर्तीच्या अधिन राहून श्री. दत्तात्रय रामचंद्र चव्हाण यांना ३० वर्ष मुदतीकरिता भाडे करारावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ४०/७

''ठराव करण्यात येतो की, जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या शिर्सुफळ कालव्याची लांबी वाढवून २४५ हेक्टर क्षेत्रास पाणी देण्याच्या सुमारे रु. १५८.७५ लक्ष इतक्या खर्चाच्या प्रस्तावास खालील दोन अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या नवीन पीकरचनेस कृषि खात्याची मंजुरी घेण्यात यावी.

२. योजनेच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालामध्ये शिर्सुफळ उजवा कालवा किमी १ ते ५ चे नुतनीकरण, टेल चॅनेलचे मुख्य कालव्यात रुपांतरण व कालव्याची लांबी वाढविणे इ. बाबींचा समावेश करण्यात यावा.''

ठराव क्र. ४०/८

''ठराव करण्यात येतो की, वांग प्रकल्पाच्या कामासाठी कंत्राटदार मे.युनिटी एशियन (डब्ल्यू) कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या प्रयत्नास पूरक वित्तीय सहाय्य म्हणून मंजूर केलेल्या अग्रीमावरील, काम बंद असलेलया १९४ दिवसांच्या कालावधींचे व्याज/दंडनीय व्याज रु.१,१३,५६,७११/- (रु. एक कोटी तेरा लाख छपन्न हजार

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

सातशे अकरा फक्त) माफ करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शासनास व महालेखापाल यांचे कार्यालयास कळविण्यात यावे.''

ठराव क्र. ४०/९

''ठराव करण्यात येतो की, उजनी धरण प्रकल्पग्रस्त श्री.दत्तु माधव गोसावी व इतर यांनी त्यांचे दि.०५.०२.२००४ च्या निवेदनानुसार विहीर खोदाई व इलेक्ट्रीक मोटार यासाठी रु.१५,११,०००/- इतक्या विशेष अनुदानाची मागणी केलेली आहे. शासनाच्या महसूल व वन विभागाच्या या विषयीच्या प्रचलित निर्णयानुसार या विषयी रु.५,५०,०००/- इतकी रक्कम देय होत असल्याने यानुसार या अनुदानाची अदायगीची शिफारस शासनास करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

परिशिष्ट क्र.१

## टेंभू योजनेअंतर्गत प्रस्तावित स्थानिक नाल्यावरील को.प. बंधाऱ्यांची माहिती

| क्र. | को.प. बंधाऱ्याचे नाव | अंदाजित साठवण क्षमता सघमी | सिंचन क्षेत्र हेक्टर | अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|---|---|
| (अ) | **आटपाडी तालुका** | | | |
| १. | नेलकरंजी करगणी ओढा | | | |
| | (१) नेलकरंजी-१ | ७०.७८ | १५ | २० |
| | (२) नेलकरंजी-२ | ५६.६३ | १२ | २० |
| | (३) नेलकरंजी-३ | ६३.७१ | १४ | २५ |
| | (४) औटेवाडी | ५६.६३ | १२ | ३० |
| | (५) कानकावेवाडी | ७०.७८ | १५ | ३० |
| | (६) मेटकरवाडी | ७०.७८ | १५ | ३० |
| | (७) गोमेवाडी (कदममळा) | ८४.९४ | १८ | ४० |
| | (८) पात्रेवाडी | ७०.७८ | १४ | ३५ |
| | (९) शेटफळे-१ | २७६.९४ | ६२ | ५०.३४ |
| | (१०) शेटफळे-२ | २७४.४० | ६२ | ५३.९० |
| | (११) शेटफळे-३ | १६९.८९ | ३६ | ४० |
| २. | जांभूळणी ओढा | | | |
| | (१) खरसुंडी ओढा | ८४.९४ | १८ | ४० |
| | (२) चिंचाळे | ८४.९४ | १४ | ४० |
| | (३) घाणंद | ८४.९४ | १३ | ४० |
| | (४) जांभूळणी-१ | ११३.२६ | २४ | ४० |
| | (५) जांभूळणी-२ | ११३.२६ | २४ | ४० |
| ३. | झरे ओढा | | | |
| | (१) कुरुंदवाडी | ८४.९४ | १८ | ३० |
| | (२) झरे (न्हावकी) | २२६.५२ | ४८ | ८० |
| | (३) झरे (भवानी देऊळ) | २२६.५२ | ४५ | ८० |

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

| क्र. | को.प. बंधाऱ्याचे नाव | अंदाजित साठवण क्षमता सघमी | सिंचन क्षेत्र हेक्टर | अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|---|---|
| ४. | शुक्र ओढा | | | |
| | (१) आटपाडी | ११३.२६ | २३ | ३५ |
| | (२) अनुसेवाडी | २५४.८३ | ५६ | ६५ |
| ५. | माडगुळे स्थानिक नाला | | | |
| | (१) माडगुळे-३ | ११३.९६ | २५ | ३५ |
| ६. | दिघंची ओढा | | | |
| | (१) दिघंची (तरसेमळा) | २५४.८३ | ५५ | ६५ |
| | (२) दिघंची (तरटेमळा) | १९८.२१ | ४२ | ६० |
| | (३) दिघंची (खंडोबा देऊळ) | २५४.८३ | ४४ | ६५ |
| ७. | विठलापूर ओढा | | | |
| | (१) विठलापूर ओढा-१ | २५४.८३ | ५० | ७० |
| | (२) विठलापूर ओढा-२ | २६८.९९ | ५८ | ७० |
| ८. | माण नदी | | | |
| | (१) बोंबेवाडी (बाराबोटे मळा) | ५९४.६२ | १३१ | १२५ |
| | **एकूण आटपाडी तालुका (२८कोपबं) :** | | **९६३** | **१३५४.२५** |
| **(ब)** | **खानापूर तालुका** | | | |
| १. | गार्डी-भांबर्डे-१ | ३१.७० | ८.८० | १६.०० |
| | गार्डी-भांबर्डे-२ | ५२.५६ | १४.८० | २०.४९ |
| | गार्डी-भांबर्डे-३ | ३९.२० | ११.०० | १७.०० |
| २. | पारे-मंगरुळ-१ | ४४.१७ | ६.०० | १८.०० |
| | पारे-मंगरुळ-२ | ३८.८५ | १०.९० | १७.०० |
| ३. | नागेवाडी-१ | २११.८३ | ५९.८० | ४२.०० |
| | नागेवाडी-२ | १९०.७० | ५३.८० | ३५.०० |
| | नागेवाडी-३ | ११५.८३ | ३२.७० | २०.५० |
| | नागेवाडी-४ | १५३.६२ | ४३.३० | २९.०० |

**मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)**
**ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता**
**आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

| क्र. | को.प. बंधाऱ्याचे नाव | अंदाजित साठवण क्षमता सघमी | सिंचन क्षेत्र हेक्टर | अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|---|---|
| ४. | माहुली-१ | ३५.३९ | १०.०० | २७.०० |
| | माहुली-२ | २८.३१ | ८.०० | २५.०० |
| ५. | लेंगरे-साळशिंगे-१ | १४.१५ | ४.०० | १७.०० |
| | लेंगरे-साळशिंगे-२ | ३५.३९ | १०.०० | १९.०० |
| | लेंगरे-साळशिंगे-३ | ३०.९१ | ८.८० | १९.०० |
| | लेंगरे-साळशिंगे-४ | ७०.३० | १९.०० | २२.०० |
| | लेंगरे-साळशिंगे-५ | ७०.७० | २०.२० | २२.०० |
| | लेंगरे-साळशिंगे-६ | ६५.३० | १८.४० | २१.५० |
| | लेंगरे-साळशिंगे-७, ८, ९ | सर्वेक्षणाची कामे हाती घेण्यात येत आहे. | | |
| ६. | ढवळेश्वर-भाळवणी-१ | १४.१५ | ४.०० | १४.०० |
| | ढवळेश्वर-भाळवणी-२ | २१.२० | ६.०० | १७.०० |
| | ढवळेश्वर-भाळवणी-३ | २९.२१ | ८.०० | १९.०० |
| | ढवळेश्वर-भाळवणी-४ | ५१.०८ | १४.८० | २२.०० |
| | ढवळेश्वर-भाळवणी-५ | ५८.६६ | १६.१० | २६.०० |
| ७. | वेजेगांव-साळशिंगे-१ | ३६.५० | १०.२० | २२.०० |
| ८. | बामणी-१ | ११.९० | ८.८० | २७.५० |
| | बामणी-२ | २०.०० | ५.६० | १८.५० |
| ९. | करंजे-१ | १८.७० | ५.२० | १८.६० |
| | करंजे-२ | २२.०० | ६.१० | २१.०० |
| | करंजे-३ | २४.७१ | ६.९० | २३.०० |
| १०. | आळसंद-१ | ३०.२० | ८.४० | १९.०० |
| ११. | कार्वे-१ | ३७.०८ | ९.४० | २१.५० |
| | कार्वे-२ | ११.९४ | ५.०० | १७.०० |
| | **एकूण खानापूर तालुका (३४कोपबं):** | **१६१६.२४** | **४५४** | **६७३.५९** |

**मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)**
**ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता**
**आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**



resolution_dirmeet_40